मराठी
न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहिराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२

www.newsexpressmarathi.com » पुणे, पिंपरी-चिंचवड » मंगळवार, दि. 15 ऑक्टोबर 2024 | पान- 1


# आता प्रतीक्षा निवडणुकीच्या घोषणेची...

## पिंपरी-चिंचवड शहरातील इच्छुकांचा वेगवेगळ्या माध्यमातून प्रचाराला प्रारंभ : जाहिरात व पत्रकबाजी करून वातावरण निर्मिती

**पिंपरी | प्रतिनिधी**

विधानसभा निवडणूक जाहीर होण्यापूर्वीच पिंपरी-चिंचवड शहरातील इच्छुकांनी वेगवेगळ्या माध्यमातून प्रचाराला प्रारंभ केला आहे. यात विद्यमानांसह पूर्वीच्या निवडणुकीतील पराभूत आणि नव्याने निवडणूक लढवू इच्छिणाऱ्यांचा समावेश आहे. जाहिरात व पत्रकबाजी करून वातावरण निर्मिती केली जात असून, सर्वांनाच निवडणूक जाहीर होण्याची प्रतीक्षा आहे. राज्य विधानसभेची निवडणूक नोव्हेंबर महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात मुदत संपत आहे. त्यापूर्वी निवडणूक होऊन नवीन सरकार अस्तित्वात येणे अपेक्षित आहे. त्यासाठी निवडणूक आयोगाकडून मंगळवार (ता. १५) किंवा बुधवारी (ता. १६) विधानसभा निवडणूक कार्यक्रम जाहीर होऊ शकतो. मात्र, त्यापूर्वीच पिंपरी-चिंचवड शहरातील पिंपरी, चिंचवड व भोसरी विधानसभेसह लगतच्या मावळ मतदारसंघातील इच्छुकांनी प्रचाराला प्रारंभ केला आहे. विद्यमानांसह त्यांच्या सहयोगी पक्षातील आणि विरोधी पक्षांतील इच्छुकांनी प्रचाराला प्रारंभ केला आहे. यात महायुती आणि महाविकास आघाडीतील घटक पक्षांचा समावेश आहे. पक्षाची उमेदवारी न मिळाल्यास, 'प्रसंगी बंडखोरी करू पण, निवडणूक लढवू' असा संकल्प अनेकांनी केला आहे. मतदारांना आकर्षित करण्यासाठी त्यांनी गेल्या महिन्यात झालेला गणेशोत्सव, नुकताच झालेला नवरात्रोत्सव, दसरा अशा सणांचा आधार घेतला आहे. गोपाळकाला दहीहंडी समारंभातही असेच चित्र होते. काही जण रिक्षा, टेंपोद्वारे आपला कार्यपरिचय मतदारांपर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न करत आहेत. काहींनी कलापथके, पथनाट्ये करणाऱ्या कलाकारांचा आधार घेतला आहे. त्यांच्या माध्यमातून मतदारसंघातील विविध ठिकाणी कला सादर करून प्रचार केला जात आहे. शिवाय, शहरातील महामार्गासह मुख्य रस्ते व मोक्याच्या ठिकाणी होर्डिंग उभारून जाहिरातबाजी केली जात आहे. यामध्ये विद्यमानांनी केलेल्या कामांची तर इच्छुकांनी भविष्यातील कामांच्या संकल्पासह विद्यमानांवर टीका करणारी जाहिरात केली आहे. असे चित्र शहरात बघायला मिळत आहे.



### वातावरण निर्मिती

» विद्यमानांकडून केलेल्या कामांची जाहिरातबाजी केली जात असून, ते मुद्दे खोडून काढणारे फलक इच्छुकांनी लावले आहेत. त्यासाठी महापालिकेने उभारलेल्या होर्डिंगसह खासगी व महापालिकेच्या जागांवर अनधिकृत फलक लावले जात आहेत.

### सावधगिरीचे पाऊल

» काहींनी पक्षाकडे रीतसर मुलाखती वा पत्र देऊन उमेदवारी मागितली आहे. काहींनी सावधानता म्हणून फलकांवर राजकीय पक्ष, नेते, ध्वज वा चिन्ह न वापरलेले नाही. राजकीय पक्षाची उमेदवारी न मिळाल्यास अपक्ष लढण्याचा, प्रसंगी पक्ष बदलण्याची तयारी ठेवली आहे.

# स्टॅम्प पेपरबाबत महत्वाची 'अपडेट'...

## शंभर आणि दोनशे रुपयांचे स्टॅम्प पेपर बंद होणार नाहीत, मुद्रांक विभागाची माहिती



**पिंपरी | प्रतिनिधी**

ॲफिडेविट, प्रतिज्ञापत्रे, पार्टनरशिप नोंदणी पत्र, संमती पत्रे, बँक लोन प्रतिज्ञापत्र, रेशनकार्डसाठी पत्ता पुरावा, संमतीपत्र, भाड्याने राहणाऱ्या नागरिकांसाठी भाडेकरार यासाठी आवश्यक असलेले शंभर आणि दोनशे रुपयांचे स्टॅम्प पेपर बंद होणार नाहीत, अशी माहिती नोंदणी व मुद्रांक विभागाच्या वतीने देण्यात आली. दस्त नोंदणीसह विविध कामासाठी शंभर आणि दोनशे रुपयांच्या स्टॅम्प पेपरची गरज भासत असते. मात्र, राज्य शासनाने दोन दिवसांपूर्वी झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत विविध कामांसाठी लागणारे शंभर आणि दोनशे रुपयांचे स्टॅम्प पेपर बंद करण्याचा निर्णय घेतला होता.

(उर्वरित पान २ वर)

# 'पीएमएवाय' योजनेतील गृहप्रकल्पाची आता स्ट्रक्चरल तपासणी

## ठेकेदारावर कारवाईची टांगती तलवार आहे. मात्र, कारवाई होणार का ? हे पहावे लागणार आहे.

**पिंपरी | प्रतिनिधी**

भोसरी येथील पेठ क्रमांक १२ मधील प्रधानमंत्री आवास योजनेच्या गृह प्रकल्पातील नागरिकांच्या सातत्याने होणाऱ्या तक्रारीनंतर पीएमआरडीए प्रशासनाला जाग आली आहे. या गृहप्रकल्पाची स्ट्रक्चरल तपासणी करण्याचे निर्देश आयुक्त योगेश म्हसे यांनी दिले आहेत. त्यामध्ये बांधकामात दर्जाहीन साहित्य वापरल्याचे आढळल्यास ठेकेदारावर फौजदारी गुन्हे दाखल होणार आहेत. त्यामुळे, ठेकेदारावर कारवाईची टांगती तलवार आहे. मात्र, कारवाई होणार का ? हे पहावे लागणार आहे. भोसरी भागात प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत पेठ क्रमांक १२ येथे गृहप्रकल्प एक आणि दोनमध्ये सदनिका बांधण्यात आल्या आहेत. तेथील सदनिकाधारकांनी काही दिवसांपूर्वी पीएमआरडीएकडे सदनिकेतील बाथरूम, टॉयलेट, टेरेस, सोलर वॉटर लाईन, ड्रेनेज लाईन आदी सुविधांबाबत तक्रारी केल्या. ठेकेदाराकडून जलदगतीने काम होत नसल्याचे गाऱ्हाणे मांडले.



### कोणत्या आहेत समस्या ?

- » सदनिकांमधील छतांना गळती.
- » स्वच्छतागृहांचे निकृष्ट काम.
- » पाण्याचा अपुरा पुरवठा.
- » सोडत लवकर न झाल्याने सदनिका धूळखात.
- » टॉयलेट, टेरेस, पाणी टाकी गळती.

### अधिकाऱ्यांना अभय ?

» गृहप्रकल्प उभारताना त्याचे काम व्यवस्थित झाले का नाही, हे पाहण्याची जबाबदारी संबंधित अधिकाऱ्याची आहे. मात्र, पाहणीकडे दुर्लक्ष केल्याने या समस्या उद्भवला गेल्याचे दिसून आले आहे. परिणामी, या अधिकाऱ्यांची चौकशी करणार असल्याचे सांगण्यात येत आहे. मात्र, त्यांच्यावर ठोस कारवाई होणार का ?, असा प्रश्न उपस्थित होत आहे.

" पेठ क्रमांक १२ गृहप्रकल्पामध्ये चुका आहेत. या प्रकल्पाच्या अनुषंगाने स्ट्रक्चरची तपासणी करण्याचे आदेश दिले आहेत. त्याचप्रमाणे महिनाभरामध्ये नागरिकांच्या तक्रारीचे निरसन करण्याचा प्रयत्न केला जाईल. बांधकाम करताना निकृष्ट साहित्याचा वापर झाला असल्यास पुढे संबंधित काम करणाऱ्या ठेकेदारावर फौजदारी कारवाई करावी लागेल.

- योगेश म्हसे, आयुक्त, पीएमआरडीए.

या तक्रारी सातत्याने होत असल्याने संबंधित ठेकेदार, अधिकारी आणि नागरिक यांची संयुक्त बैठक आयुक्त योगेश म्हसे यांनी घेत अडचणी जाणून घेतल्या. यात गृह प्रकल्पाच्या कामातील आढळून आलेले दोष, तक्रारी तातडीने निराकरण करण्यासाठी पुढील एका महिन्यात मुदत संबंधितांना देण्यात आली. त्रयस्थ संस्थेकडून गुणवत्तेची तपासणी संबंधित गृहप्रकल्प कामाच्या गुणवत्तेबाबत त्रयस्थ संस्थेकडून तपासणी करून घेत प्रमाणपत्र घ्यावे. त्यासह संबंधित ठेकेदार यांच्या कामातील संथगतीकरिता तसेच नेमून दिलेल्या कालावधीत काम पूर्ण न झाल्यास त्यांच्यावर निविदा प्रक्रियेतील अटी-शर्तीनुसार दंडात्मक व कायदेशीर कारवाई करण्याचे निर्देश यावेळी महानगर आयुक्त डॉ. योगेश म्हसे यांनी संबंधित यंत्रणेला दिले. तसेच बांधकाम करताना निकृष्ट साहित्य वापरले असल्याचे निदर्शनास आल्यास फौजदारी गुन्हा देखील दाखल करण्याचा इशारा आयुक्तांनी दिला आहे.

# पुणेकरांना आणखी दोन नव्या मेट्रो मिळणार, मंत्रिमंडळ बैठकीत निर्णय

## मंत्रिमंडळ बैठकीत मंजुरी देण्यात आली , या नव्या दोन मार्गामुळे पुणेकरांचा प्रवास आणखी सुखद होणार आहे.

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे मेट्रोच्या दोन नव्या मार्गांना मंत्रिमंडळ बैठकीत मंजुरी देण्यात आली आहे. पुण्यात खडकवासला-स्वारगेट-हडपसर-खराडी आणि नळस्टॉप-डहाणूकर कॉलनी-वारजे-माणिकबाग या दोन नव्या मेट्रो मार्गांना महायुती सरकारने कॅबिनेट बैठकीत मंजुरी दिली आहे.

विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर कुठल्याही क्षणी आचारसंहिता लागण्याची शक्यता वर्तवली जात आहे. त्यातच राज्याच्या मंत्रिमंडळाची बैठक (पार पडली. या बैठकीत अनेक मोठे निर्णय घेण्यात आले आहेत. तर पुण्यात मेट्रोच्या) आणखी दोन मार्गांना मंत्रिमंडळ बैठकीत मंजुरी देण्यात आली आहे. या नव्या दोन मार्गामुळे पुणेकरांचा प्रवास आणखी सुखद होणार आहे.

राज्य सरकारच्या मंत्रिमंडळाची बैठक पार पडली. या बैठकीत खडकवासला-स्वारगेट-हडपसर-खराडी आणि नळस्टॉप-डहाणूकर कॉलनी-वारजे-माणिकबाग या दोन मार्गांना मंजुरी देण्यात आली आहे. राज्य सरकारने या दोन मेट्रो प्रकल्पांसाठी 9 हजार 897 कोटी रुपयांच्या निधीला मंजुरी दिली आहे. या मेट्रो मर्गाची लांबी 31.63 किमी असणार आहे. तर यामध्ये 28 स्थानकांची उभारणी होणार आहे. यामुळे पुणे शहरातील मेट्रोचे जाळे चौफेर वाढणार आहे आणि भक्कम होणार आहे.

या टप्प्यातील खराडी-हडपसर-स्वारगेट-खडकवासला व नळ स्टॉप-वारजे-माणिकबाग या प्रकल्पांचे महत्त्व लक्षात घेऊन या मेट्रो मार्गांना मान्यता देण्यात आली. या मार्गिकांची एकूण लांबी ३१.६३ कि.मी. असून २८ उन्नत स्थानके आहेत. यासाठी ९ हजार ८१७ कोटी १९लाख रुपये खर्चाच्या प्रकल्पास महामेट्रोमार्फत अंमलबजावणी करण्यास देखील मान्यता देण्यात आली. पुण्यात खडकवासला-स्वारगेट-हडपसर-खराडी आणि नळस्टॉप-डहाणूकर कॉलनी-वारजे-माणिकबाग या दोन नव्या मेट्रो मार्गांना महायुती सरकारने कॅबिनेट बैठकीत मंजुरी दिली आहे.



### मुरलीधर मोहोळ यांनी मानले सरकारचे आभार

» याबाबत केंद्रीय सहकार, हवाई वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी एक्स या समाज माध्यमावर पोस्ट करत माहिती दिली आहे. त्यांनी म्हटले आहे की, पुण्यात आणखी नवे दोन मेट्रो मार्ग! 1) खडकवासला-स्वारगेट-हडपसर-खराडी 2) नळस्टॉप-डहाणूकर कॉलनी-वारजे-माणिकबाग. या दोन मेट्रो मार्गांना महायुती सरकारने कॅबिनेट बैठकीत मंजुरी दिली असून यामुळे पुणे शहरातील मेट्रोचे जाळे आणखी भक्कम होणार आहे. पुण्याच्या सार्वजनिक वाहतुकीच्या सक्षमीकरणासाठी निर्णय घेतल्याबद्दल मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, अजित पवार यांचे मनःपूर्वक धन्यवाद, असे मुरलीधर मोहोळ यांनी म्हटले आहे.

### कसा असेल मेट्रोचा मार्ग?

» खडकवासल्याहून खराडीकडे जाणाऱ्या मेट्रो मार्गामध्ये दळवीवाडी, नांदेड सिटी, धायरी फाटा, माणिकबाग, हिंगणे, राजाराम पूल, पु.ल. देशपांडे उद्यान, दांडेकर पूल, स्वारगेट स्थानक असणार असून पुढे हडपसर मार्गे खराडीला जाणार आहे. तर दुसरी मेट्रो नळस्टॉपपासून पौड फाटा, कर्वे पुतळा, डहाणूकर कॉलनी, कर्वेनगर, वारजे, दौलत नगर (सनसिटी) या मार्गे माणिकबागेला जाणार आहे. या दोन्ही मेट्रो मर्गिकेमुळे वाहतूक कोंडीची समस्या सुटण्यास मदत होणार असून सार्वजनिक वाहतूक अधिक सक्षम होणार आहे.

# कोजागिरी पौर्णिमेनिमित्ताने शहरातील उद्याने मध्यरात्रीपर्यंत खुली

## कोजागिरी पौर्णिमेचा आनंद लूटण्यासाठी शहरातील पुणे महापालिकेची उद्याने उघडी ठेवण्यात येणार आहेत.

**पुणे | प्रतिनिधी**

कोजागिरी पौर्णिमा पुणेकर मोठ्या उत्साहाता सजरी करत असतात. पौर्णिमेचा आनंद लूटण्यासाठी शहरातील पुणे महापालिकेची उद्याने सकाळी ६ ते ११ व सायंकाळी ४.३० ते रात्री १२ वाजे पर्यंत उघडी ठेवण्यात येणार आहेत.

कोजागिरी पौर्णिमा पुणेकर मोठ्या उत्साहाता सजरी करत असतात. पौर्णिमेचा आनंद लूटण्यासाठी शहरातील पुणे महापालिकेची उद्याने सकाळी ६ ते ११ व सायंकाळी ४.३० ते रात्री १२ वाजे पर्यंत उघडी ठेवण्यात येणार आहेत. नागरिकांनी याचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा, असे आवाहन पुणे महापालिकेने केले आहे.

कोजागिरी पौर्णिमेनिमित्त पुणे महानगरपालिका हद्दीमधील उद्यानांच्या वेळेत वाढ करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. सार्वजनिक उद्याने , बागा मनोरंजनासाठी मोकळ्या जागांची तरतूद करणे, नागरिकांच्या मनोरंजनासाठी उद्याने, बागा उपलब्ध करून देणे बंधनकारक आहे. पुणे महानगरपालिका अधिकारी क्षेत्रामध्ये एकूण १५ क्षेत्रिय कार्यालयाच्या हद्दीअंतर्गत उद्यान विभागामार्फत एकूण २११ उद्याने, मत्सालय व प्राणी संग्रहालय विकसित करण्यात आलेली आहे.

उद्यानांचे विकसन, सुशोभिकरण, देखभाल, देखरेख व दुरुस्ती विषयक कामे उद्यान विभागामार्फत करण्यात येतात.उद्यानांमध्ये नागरिक, लहान मुले, परदेशी नागरिक मोठ्या प्रमाणावर भेट देत असतात. १६ ऑक्टोबर २०२४ रोजी "कोजागिरी पौर्णिमा" असून, पुणे शहरातील नागरिक मोठ्या संख्येने उद्यानांमध्ये भेट देत असतात. शहरातील सर्व नागरिकांना सालाबादप्रमाणे " कोजागिरी पौर्णिमा " निमित्त उद्याने रात्री १२ पर्यंत उघडी ठेवली जाणार आहेत. ही माहिती मुख्य उद्यान अधिक्षक अशोक घोरपडे यांनी सांगितले.



# स्टॅम्प पेपरबाबत महत्वाची 'अपडेट'...

**पिंपरी | प्रतिनिधी**

( पान १ वरून )

या निर्णयामुळे सर्व सामान्य नागरिकांच्या खिशाला चांगलाच भुर्दंड बसणार आहे. परिणामी यामुळे राज्यातील नागरिक, विविध मुद्रांक विक्रेता संघटना यांनी नाराजी व्यक्त केली होती. ही बाब लक्षात घेऊन राज्याच्या नोंदणी व मुद्रांक विभागाने १००, २०० रूपयांचे स्टॅम्प पेपर सुरू राहणार असल्याचे कळविले आहे.

दरम्यान असोसिएशन ऑफ रिअल इस्टेट एजंटचे अध्यक्ष सचिन शिंगवी यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांना शंभर आणि दोनशे रुपयांचे स्टॅम्प पेपर सुरू ठेवण्याबाबत निवेदन दिले आहे.

या निवेदनात म्हटले आहे की, सर्वसामान्य जनतेला नेहमी लागणारे ॲफिडेविट, प्रतिज्ञापत्रे, पार्टनरशिप नोंदणी पत्र, संमती पत्रे, बँक लोन प्रतिज्ञापत्र, रेशन कार्डसाठी पत्ता पुरावा संमती पत्र, भाड्याने राहणाऱ्या विद्यार्थ्यांचे स्कॉलरशिप संमतीपत्र ही नेहमी लागणारी प्रतिज्ञापत्रे सरकारने शंभर रुपयांवरून पाचशे रुपये केल्याने गोरगरीब जनतेला पाचपट जास्त स्टॅम्प द्यावा लागणार आहे

हातावर पोट असणाऱ्या लोकांना या निर्णयाचा फटका बसणार असून राज्य शासनाने वाढीव मुद्रांक शुल्काचा पुनर्विचार करून मुद्रांक शुल्क शंभर रुपयांवरून पाचशे रुपयांवर करू नये, असे म्हटले आहे.

# चेन्नई एक्सप्रेस आणि गदग एक्सप्रेसला लोणावळ्यात थांबा

## गदग एक्स्प्रेसही थांबणार : मावळचे शिवसेना खासदार श्रीरंग बारणे यांच्या प्रयत्नांना यश

**पिंपरी | प्रतिनिधी**

पश्चिम महाराष्ट्रातील रहिवाशांमध्ये लोकप्रिय असलेली प्रसिद्ध चेन्नई एक्सप्रेस आणि आणि गदग एक्सप्रेस आता पर्यटन केंद्र असलेल्या लोणावळा येथे थांबणार आहे. लोणावळा स्थानक जोडल्याने मावळ तालुक्यातील लोकांना आता या महत्त्वाच्या ट्रेनमध्ये सहज प्रवेश मिळणार आहे. या बदलांचे आदेश मुंबई विभागाचे वरिष्ठ विभागीय व्यवस्थापक ब्रजेश राय यांनी जारी केले आहेत. या दोन्ही एक्सप्रेसला लोणावळ्यात थांबा मिळावा यासाठी मावळचे शिवसेना खासदार श्रीरंग बारणे यांनी केलेल्या प्रयत्नांना यश आले आहे.




> मावळमधील नागरिकांची चेन्नई एक्सप्रेस आणि गदग एक्सप्रेसला लोणावळ्यात थांबा मिळावा अशी मागणी होती. त्यासाठी रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांची भेट घेऊन सतत पाठपुरावा केला. त्याला यश आले असून दोन्ही एक्सप्रेसला लोणावळ्यात थांबा मिळणार आहे. लोणावळा स्थानक जोडल्याने मावळमधील लोकांना आता या महत्त्वाच्या ट्रेनमध्ये सहज प्रवेश मिळणार आहे.
>
> - श्रीरंग बारणे, खासदार. मावळ.

पूर्वी दादर सेंट्रल ते चेन्नई सेंट्रलपर्यंत धावणारी चेन्नई एक्सप्रेस सुमारे 1,284 किलोमीटरचे अंतर कापून कल्याण जंक्शन, पुणे जंक्शन, सोलापूर, वाडी, रायचूर, गुंटकल जंक्शन, रेनिगुंटा जंक्शन आणि अरक्कोनम जंक्शन येथे थांबत असे. ट्रेन क्रमांक 12163 ची परतीची सेवा असून जी ट्रेन क्रमांक 12164 आहे. चेन्नई सेंट्रल येथून सुटते, दादर सेंट्रल येथे येते. आता एक्सप्रेसला लोणावळ्यातही थांबा असणार आहे.

त्याचप्रमाणे गदग एक्सप्रेसही लोणावळा येथे थांबणार आहे. गदग एक्सप्रेस मुंबईतील छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस (सीएसएमटी) ते गदगमधील गदग जंक्शन (जीडीजी) पर्यंत धावते. काही प्रमुख थांब्यांमध्ये दादर सेंट्रल, ठाणे रेल्वे स्टेशन, कल्याण जंक्शन, पुणे जंक्शन, कुर्डुवाडी जंक्शन, सोलापूर, विजयपुरा (विजापूर), बागलकोट जंक्शन, बदामी आणि गदग जंक्शन यांचा समावेश आहे. पश्चिम महाराष्ट्रातून दक्षिण भारतात, विशेषतः कर्नाटकात जाणाऱ्या लोकांसाठी ही एक सुप्रसिद्ध ट्रेन आहे. ट्रेन क्रमांक 11139 ची परतीची सेवा असून ट्रेन क्रमांक 11140 आहे. आता एक्सप्रेसला लोणावळ्यातही थांबा असणार आहे. लोणावळा स्थानक जोडल्याने मावळ तालुक्यातील लोकांना आता या महत्त्वाच्या ट्रेनमध्ये सहज प्रवेश मिळणार आहे.

चेन्नई एक्सप्रेस कल्याण जंक्शन येथे संध्याकाळी 7:27 वाजता पोहोचेल आणि 3 मिनिटांच्या थांब्यासह 7:30 वाजता निघेल. परतीची सेवा सकाळी 11:40 वाजता पोहोचेल आणि 5 मिनिटांच्या थांब्यासह 11:45 वाजता निघेल. ही एक्सप्रेस लोणावळ्याला रात्री 8.56 वाजता पोहोचेल आणि 2 मिनिटांच्या थांब्यासह 8.58 वाजता निघेल. परतीची सेवा दुपारी 12:30 पोहोचेल आणि 12:42 वाजता निघेल. गदग एक्सप्रेस कल्याण जंक्शन येथे रात्री 10:15 वाजता पोहोचेल आणि 1 मिनिटाच्या थांब्यासह लगेच निघेल. परतीची सेवा पहाटे 3.33 वाजता पोहोचेल आणि 5 मिनिटांच्या थांब्यासह 3.36 वाजता निघेल. ट्रेन 11:51 वाजता लोणावळ्याला पोहोचेल आणि 11:53 ला 2 मिनिटांच्या थांब्याने निघणार आहे. परतीची सेवा पहाटे 2.05 वाजता पोहोचेल आणि 2 मिनिटांच्या थांब्यासह 2.7 वाजता निघेल.

# आयुक्तांच्या आशीर्वादानेच 'ठाण'बहाद्दर निर्धास्त

## निर्धारित मुदत संपूनही बदल्यांसाठी टाळाटाळ : खासदार, आमदारांचा हस्तक्षेप होत असल्याची चर्चा

**पिंपरी | प्रतिनिधी**

महापालिका आस्थापनेवरील वर्ग एक ते चार गटातील अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या बदल्या मार्च-एप्रिल महिन्यात करणे आवश्यक होते. मात्र, लोकसभा निवडणुकीमुळे बदल्या करण्यात आल्या नाहीत. परंतु, त्यानंतर महापालिकेतील बदलीसाठी पात्र असणाऱ्या ४३६ अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या बदल्या होणार अशी चर्चा सुरू होती, पण महापालिका आयुक्त शेखर सिंह यांनी आज-उद्या करत पाच महिने लोटले तरीही बदल्या केलेल्या नाहीत. त्यामुळे वर्षानुवर्षे एकाच ठिकाणी ठाण मांडून बसलेल्या अधिकारी-कर्मचाऱ्यांना स्वतः आयुक्तच पाठिशी घालत असल्याची चर्चा आता जोर धरू लागली आहे.



### आयुक्तांकडून बदली धोरणास हरताळ

» मुंबई उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार, महापालिका सेवेतील 'वर्ग-अ' ते 'ड'पर्यंतच्या अधिकारी, कर्मचाऱ्यांच्या बदल्यांसंदर्भात २०१५ मध्ये धोरण निश्चित केले आहे. त्यानुसार एप्रिल व मे महिन्यात बदल्या करणे अपेक्षित असते. सहा वर्ष पूर्ण झालेल्यांच्या बदल्या होणे अपेक्षित आहे. पण, या धोरणाकडे दुर्लक्ष करून अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या बदली धोरणाला हरताळ फासला जात आहे. महापालिकेच्या आस्थापनेवरील वर्ग एक ते वर्ग चारमधील अधिकारी-कर्मचाऱ्यांनी वर्षानुवर्षे एकाच विभागात ठाण मांडून बसलेल्यांच्या तातडीने बदल्या कराव्यात. या वर्षी मात्र ऑक्टोबर आला तरीही बदल्या केलेल्या नाहीत. प्रशासनाने दिलेली डेडलाइनही हुकली आहे, त्यामुळे मर्जीतील अधिकाऱ्यांच्या बदल्या होऊ नयेत, याकरिता खासदार, आमदार हे आयुक्तांवर दबाव आणत असल्याची पालिका वर्तुळात चर्चा आहे. यामुळे आयुक्त हे राजकीय दबावाखाली बदल्यांचा निर्णय घेत नसल्याची दबक्या आवाजात चर्चा आहे.

महापालिकेच्या गट अ आणि ब मधील ३६ अधिकारी तर गट क मधील तब्बल ३२९ कर्मचारी आणि टेक्निकल संवर्गातील ७१ कर्मचारी हे बदलीसाठी पात्र झालेले आहेत. त्यामुळे महापालिकेत ४३६ अधिकारी-कर्मचारी बदलीसाठी पात्र आहेत. त्यांच्या बदलीसाठी महापालिका आयुक्तांनी ऑगस्टमध्ये अहवाल मागवून घेत सप्टेंबरमध्ये बदल्या करणार असल्याचे सांगितले होते. मात्र, तब्बल पाच महिने उलटूनही आयुक्तांनी बदल्या केलेल्या नाहीत. येत्या चार-पाच दिवसांत विधानसभेची आचारसंहिता लागण्याच्या आधी बदलीस पात्र असणाऱ्यांच्या बदल्या होणार का ? केवळ बदलीचा फार्स केला जाणार? असा प्रश्नही उपस्थित केला जात आहे. महापालिकेच्या सामान्य प्रशासन विभागाने आस्थापनेवरील अधिकारी व कर्मचारी एकाच विभागात ६ वर्षांपासून अधिक काळ कार्यरत आहेत. प्रशासन विभागाने दिलेल्या माहितीनुसार कार्यकारी अभियंता, उपअभियंता, कनिष्ठ अभियंता, ज्येष्ठ वैद्यकीय अधिकारी, मुख्य लिपिक, लिपिक, साहाय्यक भांडारपाल, लेखापाल, उपलेखापाल या सारख्या पदांवर अनेक वर्षे ठाण मांडून बसलेल्या अधिकारी, कर्मचारी आढळून येत आहेत.

# अवयव प्रत्यारोपण आता अगदी कमी खर्चात!

## ससून सर्वोपचार रुग्णालयात मूत्रपिंड आणि यकृत प्रत्यारोपण शस्त्रक्रिया अगदी कमी खर्चात

**पुणे | प्रतिनिधी**

ससून सर्वोपचार रुग्णालयात मूत्रपिंड आणि यकृत प्रत्यारोपण शस्त्रक्रिया अगदी कमी खर्चात होत आहेत. खासगी रुग्णालयात यासाठी १० लाख रुपयांहून अधिक खर्च होत असताना, ससूनमध्ये सुमारे ३ लाखांमध्ये ही शस्त्रक्रिया होत आहे. त्यातही रुग्णांना इतर सरकारी योजनांचा लाभ मिळत असल्याने हा खर्च आणखी कमी होत आहे. ससूनमध्ये नुकतीच एक मूत्रपिंड प्रत्यारोपण शस्त्रक्रिया यशस्वीपणे करण्यात आली.




हडपसरमधील एका ५२ वर्षीय व्यक्तीला मूत्रपिंडविकार होता. तो या विकाराने २०१५ पासून त्रस्त होता. त्याची मूत्रपिंडे निकामी झाल्याने प्रत्यारोपण करण्याचा सल्ला डॉक्टरांनी दिला होता. हा रुग्ण एका खासगी कंपनीत फिटर म्हणून काम करतो. त्याच्या पत्नीनेच त्याला मूत्रपिंड देण्याची तयारी दाखविली. त्याची आर्थिक परिस्थिती बेताची असल्याने त्याने ससून रुग्णालयात प्रत्यारोपण करण्याचा निर्णय घेतला.

मूत्रपिंडविकारतज्ज्ञांच्या सल्ल्यानुसार रुग्ण आणि त्याच्या पत्नीच्या सर्व तपासण्या करण्यात आल्या. त्यानंतर ससूनचे समाजसेवा अधीक्षक सत्यवान सुरवसे यांनी अवयवदानाचा प्रस्ताव तयार करून तो विभागीय मानवी अवयव प्रत्यारोपण समितीसमोर सादर केला. समितीने परवानगी दिल्यानंतर अखेर ९ ऑक्टोबरला ससून रुग्णालयात ही मूत्रपिंड प्रत्यारोपण शस्त्रक्रिया यशस्वीरीत्या पार पडली. ही शस्त्रक्रिया डॉ. निरंजन आंबेकर, डॉ. संदीप मोरखंडीकर, डॉ. सुरेश पाटणकर, डॉ. राजेश श्रोत्री, डॉ. हर्षद तोष्णीवाल, डॉ. विवेक बारेकर आणि डॉ. दानिश कामेरकर यांच्या पथकाने केली.

### सरकारी योजनांचा लाभ

» ससूनमध्ये मूत्रपिंड प्रत्यारोपण शस्त्रक्रिया अत्यंत कमी खर्चात होते. ही शस्त्रक्रिया महात्मा जोतिबा फुले जनआरोग्य योजनेंतर्गत करण्यात येतात. त्यामुळे रुग्णांना औषधे, इंजेक्शन, शस्त्रक्रियेसाठी आवश्यक सर्जिकल साहित्य व शस्त्रक्रियेनंतरच्या लागणाऱ्या तपासण्या यासाठी कमी खर्च लागतो. हा खर्चही अनेक सामाजिक संस्था करतात. याचबरोबर प्रत्यारोपण शस्त्रक्रिया झाल्यानंतर पुढील एक वर्षाची औषधे महात्मा जोतिबा फुले जन आरोग्य योजनेंतर्गत मिळतात.

> ससूनमध्ये अतिशय कमी खर्चात प्रत्यारोपण शस्त्रक्रिया होतात. सरकारी योजनांमुळे रुग्णांचा प्रत्यारोपणाचा खर्च कमी होत आहे. गरजू रुग्णांनी मूत्रपिंड व यकृत प्रत्यारोपण शस्त्रक्रियांसाठी ससून रुग्णालयाशी संपर्क साधावा.
> - डॉ. एकनाथ पवार, अधिष्ठाता, ससून सर्वोपचार रुग्णालय.

# पावसामुळे फळभाज्यांची आवक कमी

## आवक कमी झाल्याने कोंबी, फ्लॉवर, हिरवी मिरची, शेवगा, गाजर, घेवडा, ढोबळी मिरची, मटारच्या दरात वाढ

**पुणे | प्रतिनिधी**

आवक कमी झाल्याने कोंबी, फ्लॉवर, हिरवी मिरची, शेवगा, गाजर, घेवडा, ढोबळी मिरची, मटारच्या दरात वाढ झाली. अन्य फळभाज्यांचे दर स्थिर असल्याची माहिती व्यापाऱ्यांनी दिली.



श्री छत्रपती शिवाजी मार्केट यार्डातील घाऊक बाजारात रविवारी (१३ ऑक्टोबर) राज्य, तसेच परराज्यातून मिळून ७५ ते ८० ट्रक फळभाज्यांची आवक झाली. गेल्या आठवड्यात झालेला पाऊस आणि दसऱ्यामुळे फळभाज्यांची आवक कमी झाली. कर्नाटक, गुजरात, आंध्र प्रदेशातून मिळून ७ ते ८ टेम्पो हिरवी मिरची, कर्नाटक, गुजरातमधून मिळून प्रत्येकी ३ ते ४ टेम्पो कोबी, कर्नाटकातून २ ते ३ टेम्पो पावटा, कर्नाटक आणि गुजरातमधून २ टेम्पो घेवडा, आंध्र प्रदेश, तमिळनाडूतून मिळून २ टेम्पो शेवगा, मध्य प्रदेशातील इंदूर भागातून ४ ते ५ टेम्पो गाजर, कर्नाटक, गुजरातमधून ४ टेम्पो भुईमूग शेंग, मध्य प्रदेशातून ७ ते ८ टेम्पो लसूण अशी आवक परराज्यातून झाली, अशी माहिती मार्केट यार्डातील ज्येष्ठ अडते विलास भुजबळ यांनी दिली.

पुणे विभागातून सातारी आले ४०० ते ५०० गोणी, भेंडी ५ ते ६ टेम्पो, गवार ४ ते ५ टेम्पो, टोमॅटो साडेपाच ते सहा हजार पेटी, हिरवी मिरची २ ते ३ टेम्पो, ढोबळी मिरची ७ ते ८ टेम्पो, पुरंदर, पारनेर, वाई, सातारा परिसरातून मटार ४० ते ५० गोणी, काकडी ८ ते १० टेम्पो, कोबी २ ते ३ टेम्पो, फ्लॉवर २ ते ३ टेम्पो, तांबडा भोपळा ८ ते १० टेम्पो, कांदा ७० ते ७५ ट्रक, तसेच इंदूर, आग्रा, स्थानिक भागातून ३५ ते ४० टेम्पो बटाट्याची आवक झाली.

**पालेभाज्यांचे शेकड्याचे दर पुढीलप्रमाणे –**

कोथिंबीर- १००० ते १५००, मेथी – १५०० ते २०००, शेपू – १००० ते १५००, कांदापात- १५०० ते १८००, चाकवत – ४०० ते ८००, करडई- ५०० ते ८००, पुदिना – ५०० ते ८००, अंबाडी – ४०० ते ७००, मुळे – ८०० ते १५००, राजगिरा- ४०० ते ७००, चुका – ६०० ते १०००, चवळई- ४००-८००, पालक- १२००-१५००.

### मेथी, शेपू, कांदापात, करडईच्या दरात वाढ

» मेथी, शेपू, कांदापात, चाकवत, करडई, चुका, चवळई या पालेभाज्यांच्या दरात वाढ झाली. राजगिऱ्याच्या दरात घट झाली असून, कोथिंबिर, पुदीना, अंबाडी, मुळे, पालक या पालेभाज्यांचे दर स्थिर असल्याची माहिती व्यापाऱ्यांनी दिली. मार्केट यार्डातील तरकारी विभागात कोथिंबीर दीड लाख जुडी, तसेच मेथीच्या ५० हजार जुडींची आवक झाली.

### मोसंबी, पपई, चिकूच्या दरात वाढ

» मोसंबी, पपई, चिकूच्या दरात वाढ झाली. पेरुच्या दरात घट झाली असून, डाळिंब, संत्री, कलिंगड, खरबूज, सीताफळाचे दर स्थिर असल्याची माहिती फळबजारातील व्यापाऱ्यांनी दिली. फळबाजारात रविवारी मोसंबी ४० ते ५० टन, संत्री ८ ते १० टन, डाळिंब १० ते १५ टन, पपई १५ ते २० टेम्पो, लिंबे आठशे ते एक हजार गोणी, कलिंगड ७ ते ८ टेम्पो, खरबूज ३ ते ४ टेम्पो, चिकू एक हजार गोणी, पेरू २०० प्लास्टिक जाळी (क्रेट), अननस ४ ट्रक, सीताफळ २० ते २५ टन अशी आवक झाली.